# १३. पोलीस नियंत्रण कक्ष

सर्व जिल्ह्यांमध्ये तसेच पोलीस आयुक्तालये व महत्त्वाच्या शहरांमध्ये 'पोलीस नियंत्रण कक्ष' स्थापन केलेले आहेत. हे पोलीस नियंत्रण कक्ष दिवस-रात्र कार्यरत असतात. पोलीस नियंत्रण कक्षाच्या इतर दूरध्वनी क्रमांकाशिवाय १०० नंबर हा सर्वसाधरण दूरध्वनी क्रमांक कार्यरत आहे. ही दूरध्वनी सेवा विनामूल्य आहे. सदर दूरध्वनीची तात्काळ दखल घेण्यात येईल अशी ग्वाही देण्यात येत आहे.

दूरध्वनीच्या १०० क्रमांकावर संपर्क न झाल्यास बृहन्मुंबईसाठी नियंत्रण कक्ष अधिकारी/सहाय्यक पोलीस आयुक्त यांच्याशी दूरध्वनी क्रमांक २६७३८८७, २६२३०५४, २६२१८५५ वर संपर्क साधावा. इतर जिल्ह्यामध्ये नियंत्रण कक्ष अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.

कुठल्याही गुन्ह्यात किंवा अपघातासंबंधी, आणीबाणीच्या प्रकरणी, ज्यात पोलिसांची तातडीने मदत हवी असेल, अशा परिस्थितीत नियंत्रण कक्षाकडे दूरध्वनीद्वारे संपर्क साधावा. जेणेकरून नियंत्रण कक्ष संबंधित पोलीस ठाण्यास माहिती देईल व तातडीने 'फिरते बिनतारी गस्त पथक वाहन' घटनास्थळी त्वरित पाठविण्याची व्यवस्था करतील.